# भगवान बुद्धांचा आर्थिक संदेश

जी . एच . पांडे
रामकृष्ण महाविद्यालय दारापूर जी अमरावती

जगातील अनेक महान विद्वान पंडितांनी तथागत भगवान गौतम बुद्धांविषयी असे मत व्यक्त केलेले आहे की,अरहत संमेक तथागत भगवान गौतम बुद्ध हे एक महान धार्मिक व दार्शनीक महापुरुष होते.परंतु हे पूर्ण सत्य समजता येणार नाही.त्यांचे संपूर्ण उपदेश महासागराप्रमाणे आहेत.याची संपूर्ण जगाला जाणीव आहे.

तथागत भगवान बुद्ध हे जगाच्या पाठीवर खूप मोठे अर्थतज्ञ होते. जगामध्ये भगवान बुद्धाच्या धम्माचा उदय म्हणजे तत्कालीन सामाजिक, धार्मिक ,आर्थिक ,राजकीय परिस्थितीचा परिणाम होय . समाजामध्ये बहुजन लोकांचे जे सामाजिक उत्तपिडन होत होते त्यांच्या मागची संपूर्ण कारण मीमाणसा तथागत भगवान बुद्धांनी केलेली होती. त्या कारणांचा शोध घेतल्यानंतर त्याचे निराकरण करण्यासाठी उपाय सुद्धा सांगितले.

त्या काळामध्ये दार्शनीक दोन वर्गांमध्येविभाजित होते .पहिल्या वर्गातील लोक म्हणत होती की, "यावज्जीवेत्, सुखं जीवेत्, ऋणं कृत्वा घृतं पिवेत्" अर्थात जरी कर्ज घेण्याची वेळ आली तरी,जोपर्यंत जीवन आहे दूध आणि तूप प्यावे.दुसऱ्या वर्गातील जे दार्शनीक होते ते उपाशी राहून सुद्धा मोक्ष प्राप्त करण्याची इच्छा मनामध्ये बाळगत होते .

तथागत भगवान गौतम बुद्धांनी ही दोन्ही मार्ग व्यर्थ मानले कारण ही दोन्ही मार्ग समस्त मानव समाजासाठी हितकारक नाहीत असे त्यांनी सांगितले . कारण यामध्ये शरीर सुखाचा अतिरेक आणि काया क्लेशाचा अतिरेक होतो. म्हणून यांच्या दोघांतील मध्यम मार्गाची स्थापना भगवान बुद्धांनी केली .

भगवान बुद्धांनी असे सांगितले की , या जगातील प्रत्येक प्राणी दुःखी आहे , परंतु या दुःखाचे काही ना काही तरी कारण आहे.त्या सर्व कारणांना दूर केल्या जाऊ शकते , त्यांना दूर करण्याचा मार्ग सुद्धा आहे . तो आहे आर्य अष्टांगिक मार्ग.तथागत भगवान बुद्धांनी जे लोक दुःखाचे परीक्षण केले होते ते एखाद्या कुशल वैद्य का प्रमाणे किंवा चिकित्सकाप्रमाणे होते . म्हणूनच तथागत भगवान बुद्धांनी रोग समजल्यानंतरच त्याचे निदान व उपचार सांगितले . तथागत भगवान बुद्धांनी समाजातील लोकांना अतिशय जवळून पाहिले होते . दास प्रथा आणि त्यांच्यावर होणारे अमानवीय अत्याचार त्यांनी

स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले होते . गुलामाच्या रूपाने मनुष्य विकल्या जात होते , विकत घेतल्या जात होते . गुलामांना त्यांचे मालक पशु पेक्षाही नीच मानत होते . म्हणून बुद्धांनी नियम बनविला होता की , कोणत्याही दासाला भिक्षू बनविल्या जाऊ नये . जर तो भिक्षू बनू इच्छित असेल तर त्याने कर्जातून मुक्त होणे आवश्यक होते . गुलामीचे मुख्य कारण म्हणजे निर्धन असणे , आणि सामाजिक दूरव्यवस्था ही होते . पोटाचा प्रश्न हा नेहमीअसतो आणि आहे सुद्धा तो नेहमीच राहील . भुकेलेला मनुष्य हा काय करणार नाही , धर्माचे ग्रहण सुद्धा करणार नाही, म्हणून भगवान बुद्धांनी भूख सगळ्यात मोठा रोग आहे असे सांगितले होते. आळवी मध्ये तथागत भगवान बुद्धांनी भूखेसंबंधी अतिशय महत्त्वाचा उपदेश दिला होता . आळवी नावाचे बुद्ध काळामध्ये एक अनार्य राज्य होते. त्याच्या राजधानीचे नाव सुद्धा आळवी होते . ज्याची ओळख उन्नाव जिल्हयामध्ये बांगर मऊ गावाजवळ स्थित नेवल च्या विशाल नगरा सोबत केली जात होती . येथील राज्याचे नाव आडवक होते , जो भगवान बुद्धांचा अनुयायी होता . बुद्ध तेथे अनेक वेळा आले होते.एके वेळी तथागत भगवान बुद्ध आपल्या भिक्षु संघासोबत आळवी येथे मुक्कामी असताना ते दररोज धर्मोपदेश करीत होते . एक दिवस आळवी मध्ये एका शेतकऱ्याचा बैल हरविला . खूप शोध घेतल्यानंतर खूप उशिरा तो बैल सापडला. त्या शेतकरयाने आपला बैल घरी बांधून ठेऊन , काहीही न खाता पिता भगवान बुद्धाचा उपदेश ऐकण्यासाठी आला . परंतु भूखे मुले तो खूप बेचैन झाला होता . ज्या मुले भगवान बुद्धाच्या उपदेश्यामध्ये

त्याचे मन लागत नव्हते .महाकारुनिक तथागत भगवान बुद्धाने त्याचे मन जाणले व आपल्या एका भिक्षूला आदेश

देऊन त्या शेतकऱ्याला जेऊ घातले . त्या नंतर त्याने अतिशय एकाग्र चित्ताने धर्म श्रवण केला . जेव्हा संध्याकाळी धर्म सभेमध्ये भिखुनी या शेतकऱ्याला भोजन दिल्याच्या घटने विषयी विचारले , तेव्हा तथागत बुद्धांनी संपूर्ण घटना क्रम सांगितला . त्याच वेळी तथागत बुद्धांनी भूखेला महान रोग आहे असे सांगितले होते .

खुद्दक पाठ ग्रंथामध्ये सुद्धा संदेश आहे , कि महत्वाच्या दृष्टीने पहिले तर मानवी जीवनामध्ये भोजनाला

अतिशय महत्व आहे त्याला प्रथम स्थान आहे कारण सर्व प्राणी भोजनावरच टिकून आहेत . भोजनाचा समंध

मिळकती शी आहे . मनुष्याकडे मिळकती साठी काही ना काही साधन असणे आवश्यक आहे .समाजाच्या समृद्धीसाठी आवश्यकता आहे कि , गरज पूर्ण करण्यासाठी अनुरूप

उत्पादन होत राहावे . भगवान बुद्धाच्या विचाराने प्रत्येक व्यक्तीनचे उत्पादन करण्यामध्ये योगदान असावे . त्यांनी अतिशय दृढतापूर्वक म्हटले कि जो

कुणी व्यक्ती मेहनत करून उत्पादन न करता राष्ट्राचे अन्न खातो , तप्त लोखंडाचा गोळा खातो . या कठोर भाषेतत्यांनी त्या लोकांना मेहनत करून उत्पादन करण्यासाठी प्रेरित केले होते , कि जे लोक ऐदी व कामचुकार होते . जे काम करण्यापासून दूर राहत होते .

कृशिसंम्पन्न राजकुळा मध्ये तथागत भगवान बुद्धांचा जन्म झाला होता , जेथे राजा सुद्धा कृषी मोहोत्सवामध्ये आपल्या मंत्र्यांसोबत शेतात नांगर जुंपून काम करत होता . बालक शिद्धार्थ गौतमाने सुद्धा असे मोहोत्सव आपल्या डोळ्यांनी पहिले होते , आणि सत्य तर हे आहे कि , अश्याच एका कृषी मोहोत्सवा प्रसंगी जेहवा नांगर जुंपल्या नंतर शेतात नांगर चालत असताना जमिनीतून जे किडे निघत होते ते किडे खाउन पक्षी अतिशय प्रसन्न होत होते , ते पाहून मानव समाजातील मात्सय न्याय या विषयी तथागत बुद्धाना अनुभूती होत होती. येथे सबल निर्बलांना उत्पिडीतच करत नाही तर त्याला खाऊन सुद्धा टाकतो. त्याचे अस्तित्वच नष्ट करून टाकतो .

समाजात गरिबी , दुर्बलता आणि निर्धनता काय आहे यावर विचार करताना महामानव बुद्धांनी उत्पादनावर खूप जोर दिला . येथे काही लोक कष्ट करता करता मरतात , पण त्यांना पोटभर भोजन सुद्धा मिळत नाही , आणिकाही असे लोक आहेत कि ते खाऊ खाऊ मरतात , जे अजिबात काम करत नाहीत . अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे कि , जर उत्पादन भरपूर होईल तर समाज अभावग्रस्त राहणार नाही आणि तो सुख - शांती चा अनुभव करू शकेल .

मनुष्याने उपजीविका करावी व धनाचे संपादन करावे हे अतिशय आवश्यक आहे . परंतु त्यापेक्षाही अतिशय

महत्वपूर्ण बाब अशी कि , त्या व्यक्तीने आपल्या मिळकतीचा चांगल्या प्रकारे खर्च करावा . या विषयी तथागत भगवान बुद्धाचा स्पष्ट निर्देश आहे कि , आपले उत्पादन चार भागात विभाजित करावे . एका

भागाने आपले पालन पोषण करावे , दोन भागांनी जीविका चालवण्याचा उद्योग , रोजगार करा आणि

चौथा भाग भविष्यासाठी राखून ठेवावा . जर अचानक संकट आले , पारिवारिक कष्ट , रोग इत्यादी

पासून पिडीत झाल्यावर खर्चासाठी राखून ठेवावा . संभावत: कार्ल मार्क्स याने भगवान बुद्धांच्या याच

सिद्धांतावर आधारित समाजासाठी आपली आर्थिक नीती निर्धारित केली होति .

समाजामध्ये व्याप्त आर्थिक विषमतेचे प्रमुख कारण धनाचा संग्रह होय . लोक दुसरयाचा विचार न करता आपल्या गरजेपेक्षा अधिक धनाचा संचय करतो , ज्यामुळे दुस र्याकडेवास्तूची कमतरता पडते . भगवान बुद्धांनी या संग्रह प्रऊत्तीला रोकण्यासाठी सर्वात आधी आपल्या भिक्षु संघामध्ये हा नियम बनउन दिला कि कुणीही भिक्षुने दोन जोडी चीवारा पेक्षा अधिक आपल्या जावड ठेऊ नये . अधिक प्राप्त होत असेल तर त्याने बुद्ध विहारमध्ये जमा करावे . जेथून ज्या भिक्शुकडे चीवर कमी असेल , त्यांना दिल्या जाऊ शकेल आजही त्यांचा संग्रह नियम बौद्ध भिक्षु संघामध्ये व्यवहारात आहे . बुद्धाद्वारे निर्देशित हि वितरण प्रणाली समाजासाठी आज सुद्धा उपयोगी सिद्ध होईल , जर शासन कठोर पने याचे पालन करेल तर .

भगवान बुद्धांनी व्यक्तीगत श्रेष्ठत्वा पेक्षा सामुहिक स्वामित्वाची स्थापना केली . श्रावस्ती च्या अनाठ्पिंडक याने जेतवन विहार बनउन , जेव्हा बुद्धाला समर्पित करण्यची इच्छा व्यक्त केली , तेव्हा बुद्धाने म्हटले हे सावकार हे विहार बुद्धासाठी नाही तर , हे विहार भिक्षु संघाला दान कर . हीच त्यांची सामुहिक स्वामित्वाची स्थापना होती .अश्याप्रकारे तथागत भगवान बुद्धांनी एक धार्मिक चिंतकच नाही तर ते महान आर्थिक चिंतक सुद्धा होते .त्यांच्या आर्थिक चिंतनाच्या उपयुक्त बिन्दुनी हे स्पष्ट होते कि , ते देश्यात एक अस्या आर्थिक व्यवस्थेची स्थापना करू इच्छित होते कि , जो मध्यम मार्गी असावा , ज्या मध्ये सामुहिक स्वामित्व असावे आणि समान वितरणाची व्यवस्ता असावी . लोक अपव्यय न करणारे असावे . आपल्या ज्या आवश्यकता आहेत त्याच्या पूर्तीसोबत दुसर्याची आवश्यकता पुरती सुद्धा अनुभव करावी . यासाठी दान अथवा त्यागाची सवय लावावी . आज देश्यासाठी बुद्धाच्या अश्याच आर्थिक विचाराची आवश्यकता आहे , ज्यापासून आवश्यकता - पूर्तीसाठी परिपूर्ण उत्पादन होऊ शकेल आणि देशाला दुसरया देश्यांकडे हाथ पसरण्याची वेळ येऊ नये .

संदर्भ :- १) बुद्ध आणि त्यांचा धम्म,डॉ . बाबासाहेब आंबेडकर समता प्रकाशन नागपूर .

२) जातक कथा , भदंत आनंद कौश्यल्ल्यायन .

३) बुद्ध कालीन धर्म और समाज , डॉ . मदन मोहन सिह ४) बौद्ध धम्म और सामाजिक न्याय, भन्ते कश्यप